प्रत:—

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई

मजकुर :—

दिनांक १३/०३/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " माहे जानेवारी —२०२० या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेंची/गुन्हे शाखा कक्ष यांची निवड करण्यात आलेली आहे.

## अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जानेवारी — २०२०

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे प्रकटीकरण शाखा खंडणी विरोधी कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. ०५/२०२० कलम ३८७, ३४, १२०(ब) भादवि. |

—: ' फोनद्वारे धमकी देऊन खंडणी ' :—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— सदर गुन्हयातील फिर्यादी इम्रान बाबु कुरेशी वय ४२ वर्षे, रा. ठि. ए विंग, १७ वा माळा, स्कायपर टॉवर, पाली हिल मार्केट रोड, बांद्रा (प), मुंबई हे बांधकाम व्यावसायिक असून आरोपी गँगस्टर एजाज लकडावाला हा त्यांना विविध आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून मेसेज पाठवून व कॉल करून खंडणीसाठी धमकावत होता. त्याविरूध्द फिर्यादी यांनी वांद्रे पोलीस ठाणे, गु.र.क्र. २४/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला होता.

तसेच या व्यतिरिक्त आरोपी गँगस्टर एजाज लकडावाला याने मुंबईतील सुमारे ८२ व्यावसायिकांना खंडणीसाठी धमकावले होते. त्याचेविरूध्द मुंबईतील विविध पोलीस ठाणेमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री इम्रान बाबु कुरेशी वय ४२ वर्षे, |
| बळीत/मयत | :— | इम्रान बाबु कुरेशी वय ४२ वर्षे व मुंबईतील ८२ व्यावसायिक |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) शिफा शाहीद शेख उर्फ सोनिया मनिष अडवानी उर्फ सोनिया एजाज लकडावाला उर्फ सोनिया चौधर,<br>२) एजाज युसुफ लकडावाला वय ५० वर्षे,<br>आरोपी क्रमांक १ दिनांक ०६/०१/२०२०<br>आरोपी क्रमांक २ दिनांक ०८/०१/२०२० |

तपास कौशल्य :— सदर गुन्हयातील फिर्यादी व्यतिरिक्त गँगस्टर एजाज लकडावाला याने मुंबईतील सुमारे ८२ व्यावसायिकांना खंडणीसाठी धमकावले होते. गँगस्टर एजाज लकडावाला हा परदेशात राहत होता, तसेच तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्राप्त केलेल्या आभासी मोबाईल क्रमांकाच्या मदतीने त्याने मुंबईत दहशत निर्माण केली होती.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, खंडणी विरोधी पथकाने सुरूवातीस एजाज लकडावाला याची मुलगी शिफा शाहीद शेख हिचा शोध घेतला असता ती बनावट कागदपत्राच्या आधारे प्राप्त केलेल्या पारपत्राच्या आधारे नेपाळ येथे जात असताना तिला ताब्यात घेतले. अटक शिफा शाहीद शेख, हिने तिच्या वडीलांबाबत सांगीतलेली माहीती दिशाभुल करणारी होती. तरीदेखील खंडणी विरोधी पथकाने किचकट अशा तंत्रज्ञानाचा वापर करून स्वत:चे अस्तित्व लपवित असलेला

गॅगस्टर एजाज लकडावाला याचा माग काढला व त्यास दिनांक ०७/०१/२०२० रोजी पाटणा, बिहार येथून ताब्यात घेतले.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, खंडणी विरोधी पथकाने २ वर्षापासून सतत तांत्रिक तपास करून आरोपी गॅंगस्टर एजाज लकडावाला वापरीत असलेल्या आभासी तंत्रज्ञानाची माहितीची उकल केली. व गॅंगस्टर एजाज लकडावाला याचा छडा लावला. गॅंगस्टर एजाज लकडावाला हा सन २००२ साली भारताबाहेर पळून गेला होता. तेव्हापासून तो विविध संवेदनशिल गुन्हयात पाहिजे आरोपी होता. त्याने स्वत:ची गुन्हेगारी टोळी निर्माण करून मुंबईतील मुख्यत्वेकरून बांधकाम व्यावसायिकांत दहशत निर्माण केली होती. तपासादरम्यान आरोपीताकडे कसून चौकशी केली व आरोपीताने तंत्रज्ञानाचा वापर करून खंडणीसाठी प्राप्त केलेल्या आभासी मोबाईल क्रमांकाबाबत माहिती प्राप्त केली. तांत्रिक तपासात त्याने आभासी क्रमांकावरून संपर्क साधलेल्या बळीत व्यक्ती व त्याचा साथीदारांबाबत माहिती प्राप्त केली. आरोपी गॅंगस्टर एजाज लकडावाला याच्या संपुर्ण टोळीबाबतची माहिती गुन्हे प्रकटीकरण शाखा, खंडणी विरोधी पथकास प्राप्त झालेली आहे.

गॅंगस्टर एजाज लकडावाला याच्या अटकेमुळे त्याला बातमी देणारे मुंबईतील त्याचे साथीदार, पैश्याचा व्यवहार सांभाळणारे हस्तक, यांच्याबाबत माहिती प्राप्त झालेली असून त्यांना देखील नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखा, खंडणी विरोधी पथकाच्या सदर कामगिरीमुळे अनेक वर्षापासून मुंबईतील व्यावसायिकांना भयभित करणाऱ्या एका संघटीत गुन्हेगारी टोळीचा अस्त झालेला आहे. पोलीसांच्या नमुद कामगिरीमुळे मुंबई गुन्हे शाखेबाबत लोकांमध्ये विश्वास निर्माण झालेला आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा खंडणी विरोधी कक्षातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्र.पो.नि. | श्री. अजय खाशाबा सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २ | पो.नि. | श्री. सचिन मुरारी कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.नि. | श्री. अरविंद सुदाम पवार | प्रशस्तीपत्रक |
| ४ | स.पो.नि. | श्री राजु संपत सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | स.पो.नि. | श्री. विश्वास आनंदराव पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ६ | स.पो.नि. | श्री सुनिल विलास पवार | प्रशस्तीपत्रक |
| ७ | **स.पो.नि.** | **श्री सुशीलकुमार पंडीत वंजारी** | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.उ.नि. | श्री सुनिल गणपत सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | स.फौ. २२३९३ | श्री कृष्णाजी यशवंत सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.फौ. २५२८७ | श्री कृष्णा हरिबा जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. २५६९९ | श्री दगडुभाऊ संपत काळे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ९७३१ | श्री संतोष संभाजीराव दरेकर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | पो.ह.क्र. १६४२ | श्री अरूण दादा जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ३१३६ | श्री प्रविण शंकर भांडे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. २६५२२ | श्री लक्ष्मण सोपान बोरकर | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. २७५१६ | श्री मनोहर चंदू कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ३६६३ | श्री हरिचंद्र रामचंद्र जगदाळे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.क्र. ३४१५९ | श्री अनिल बापू रणखांबे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र. ९६१२६० | श्री विजय शांताराम थोरात | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र. ९७११४५ | श्री सचिन निंबा पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र. ९८०४६८ | श्री भरत पापा वाजे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र. १२९३६ | श्री प्रितम मोहन पांचाळ | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ना.क्र. ०१७६६ | श्री सचिन चंद्रकांत दळवी | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ना.क्र. ०३१२५ | श्री महेश रामचंद्र मुळे | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ना.क्र. ०३३९५ | श्री निलेश सुदाम कंद | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.ना.क्र. ०३५९६ | श्री तुषार प्रकाश सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र.०४.०६६६ | श्री रोहन रविंद्रनाथ सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. ०४१०३८ | श्री स्वप्निल सदानंद शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र. ०६१३१७ | श्री संदिप भिका पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३० | म.पो.शि.क्र. ०४०९३१ | श्रीमती कुमुदिनी राहुल जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ह.चा ३११६४ | श्री प्रविण बाळकृष्ण पवार | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ना.चा ३४०२७ | श्री राजेंद्र सदाशिव आंधळे | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.शि.चा ०७०१७३ | श्री राकेश भिका नवसारे | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.शि.चा १४१३५८ | श्री सचिन शिवदास परदेशी | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | घाटकोपर पोलीस ठाणे परिमंडळ — ०७ | गु.नों.क्र. ८९८/२०१९ कलम ३०२, २०१ भादवि |
|---|---|---|

—: ' **खुन** ' :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— दिनांक ३०/१२/२०१९ रोजी सकाळी ०९.३० वा. चे सुमारास घाटकोपर पोलीसांना माहिती प्राप्त झाली की, घाटकोपर पोलीस ठाणे हद्दीतील नौसेना विहार रेन्सीडनसी गेटजवळील नाल्याशेजारी, विदयाविहार एस.टी. डेपो समोर, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई येथे एका चादरीमध्ये तपकीरी रंगाच्या चिकटपट्टीने चिटकवलेली संशयास्पद पोतडी पडलेली आहे.

त्यानुसार घाटकोपर पोलीस ठाणेचे पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले त्यांनी नमुद संशयास्पद पोतडी उघडुन त्याची पाहणी केली असता त्यात अंदाजे ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी स्त्री जातीचे मुंडके व गुडघ्यापासून दोन्ही पाय नसलेले मृतदेह आढळुन आले. सदरची बातमी परिसरात पसरताच सर्वत्र भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या संदर्भात पो.उ.नि. मोहन जगदाळे यांची फिर्याद घेऊन गुन्हा करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. मोहन जगदाळे, व्यवसाय— नोकरी (पोलीस उप निरीक्षक, |
| बळीत/मयत | :— | बदरुनीसा मोहम्मद शफी शेख, वय ४८ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | मो. सोहेल मो.शफी शेख, वय ३२ वर्षे, दिनांक ०९/०१/२०२० |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. पोलीस उप आयुकत, परिमंडळ ७, मुंबई यांनी घाटकोपर पोलीस ठाणे तसेच परिमंडळ ७ मधील विविध पोलीस ठाण्यातील कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष पथके तयार केली. सदर गुन्ह्यात आरोपीने स्वतःचा बचाव व्हावा या उद्देशाने यातील मृत महिलेची ओळख पटु नये याकरिता तिच्या शरीराचे तुकडे करुन दोन्ही पाय व मुंडके याची अन्य ठिकाणी विल्हेवाट लावली होती. सदरचे पाय व मुंडके शोधुन मृताची ओळख पटविणे तसेच यातील आरोपीताचा शोध घेऊन त्यास अटक करणे हे आव्हान होते. त्यासाठी विशेष पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांकरवी बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहर, ठाणे ग्रामीण आणि रायगड जिल्ह्यातील गेल्या महिन्यात हरविलेल्या महिलांची माहिती संकलित करुन शोध घेण्यात आला.

सदर गुन्हयात मृत महिलेचे दोन्ही पाय आरोपीताने घाटकोपर पोलीस ठाणे हद्दीत खल्लई रोड व मुंडके विनोबा भावे नगर पोलीस ठाणे हद्दीत रेल्वे लाईन लगत टाकुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. सदरचे अवयव नमुद तपास पथकाने घाटकोपर, कुर्ला, साकीनाका परिसरातील नाले, कचरा फेकण्याच्या जागा दत्यादी ठिकाणे अक्षरशः पिंजुन काढुन शोध लावून ताब्यात घेतले. गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने जवळपास ०७ कि.मी. परिसरातील मार्गाचा मोबाईल

डम्प डाटा घेण्यात आला. त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी धड, पाय व मुंडके ज्या ठिकाणी मिळाले त्याठिकाणी जाणाऱ्या—येणाऱ्या प्रत्येक रस्त्यांचा काळजीपुर्वक अभ्यास करुन त्या मार्गावारील सरकारी तसेच खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज (चित्रफिती) प्राप्त करण्यात आले. अशा प्रकारे जवळपास ११८ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज प्राप्त करण्यात आले.

तपासाच्या अनुषंगाने प्राप्त करण्यात आलेल्या फुटेजची तपासी पथकाने बारकाईने पाहणी केली. त्यामध्ये एक इसम हा स्कुटीवरुन मोठी वस्तु घेऊन जाताना दिसून आला. रात्रीच्या वेळेच्या अंधुक प्रकाशातून ते फुटेज पुर्णपणे अस्पष्ट होते. त्या अस्पष्ट हालचालीवरुन त्याच्या पुढील व मागील कॅमेऱ्यांची वेळ जुळवुन पाहणी केली असता, नमुद आरोपीने ते धड स्कुटीवरुन घटनास्थळावर आणल्याचे स्पष्ट झाले. प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेज अस्पष्ट असल्याने आरोपींची ओळख पटत नव्हती. तपासी पथकाने आरोपी ज्या परिसरातुन निघाला तो नेमका परिसर शोधुन काढला. व त्यानंतर पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीच्या घराचा शोध लावला व आरोपी मो. सोहेल मो. शफी शेख, वय ३२ वर्षे, यास ताब्यात घेतले.

आरोपीकडे चौकशी करतेवेळी त्याने सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली. परंतु, सी.सी. टी.व्ही. कॅमेरा फुटेज व सी.डी.आर. डम्प डाटा याद्वारे प्राप्त तांत्रिक मुद्यांच्या आधारे आरोपीजवळ चौकशी केली असता त्याने त्याची आई ही सतत त्यास बेरोजगार असल्याचे व काही कमाई करित नसल्याने त्यास टोचुन बोलत असे व भांडण करित असल्याने त्याचा राग अनावर झाल्याने प्रथम त्याने आईचा गळा दाबुन व नंतर हातोडीने डोक्यावर प्रहार करुन खुन केल्याचे कबुल केले. यातील मिळालेले स्त्री जातीचे धड, मुंडके व पाय हे त्याचेच आईचे असल्याचे त्याने तपासा दरम्यान सांगितले.

घाटकोपर पोलीस ठाणेतील तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयात कोणताही दुवा अथवा धागेदारे नसताना सी.सी.टी.व्ही. कॅमेरा फुटेज व सी.डी.आर. डम्प डाटा या तांत्रिक तसेच गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीताचा शोध घेऊन त्यास अटक केले व त्यास विश्वासात घेऊन त्याचेकडे कुशलतेने चौकशी करुन नमुद गुन्हा उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

घाटकोपर पोलीस ठाणे तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | व.पो.नि. | श्रीमती कुसुम वाघमारे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | प्रमोद कोकाटे, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक | समाधान चव्हाण, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहा.पोलीस निरीक्षक | दिप बने, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहा.पोलीस निरीक्षक (मुलूंड पो.ठा) | संतोष कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहा.पोलीस निरीक्षक (कांजुरमार्ग पो.ठा) | सुनिल जातक | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र. ०३.१३५८ | अमोल दरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र. ०७.१२६० | अविनाश परब | प्रशस्तीपत्रक |